# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 21/04/2023 (शुक्रवार) दुपार

## चोरी

**पो.स्टे. खापा :–** अंतर्गत ०२ कि.मी अंतरावरील गूमगाव शिवार येथे दिनांक २०/०४/२०२३ चे ०२/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– दिलीप शंकरराव पारवेकर, वय ४५ वर्ष, रा. कोराडी नागपूर मुख्यालय तंत्रज्ञान मा. वी खापा यास लाईन मॅन कन्हैयालाल कोलते रा. निमतलाई यांनी सांगीतले की गूमगाव शिवार येथील टायर कंपनीच्या मागे असलेले ७ सिमेंटचे पोल खाली पडले आहे तसेच ८ सिमेंट पोल वरील अॅल्युमिनीयम तार गायब आहे अशा मिळालेल्या माहीती वरून फिर्यादी यांनी सदर घटनास्थळी जावून पाहणी केली असता कोणीतरी अज्ञात चोराने ७ सिमेंटचे पोल पाडून नूकसान केले व ८ सिमेंट पोल वर १.७ की एम चे अॅल्युमिनीयम किंमती अंदाजे ५००००/– रूपयाची तार चोरी करून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९, ४२७ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ नारायन बोरकर ब. नं १२९७ मो. नं. हे करीत आहे.

## गैरकायदयाची मंडळी

**पो.स्टे. सावनेर :–** अंतर्गत ०५ कि.मी अंतरावरील मौजा मानेगाव शिवार येथे दिनांक १६/०४/२०२३ चे ११.०० वा. ते दि. २०/०४/२०२३ चे १७.३० वा. पावेतो यातील **आरोपी नामे– १) श्रीमती जनाबाई धोटे २) माया विलास जुमडे रा. नागपुर ३) अर्चना मोहन ठाकरे रा. नागपुर ४) सौ. वनिता हरीभाउ ठाकरे ५) संकेत मोहन ठाकरे रा. इसापुर ६) बाबा पांडुरंग धोटे ७) सुरेश रामचंद्र इंगळे** यांनी गैरकायदयाची मंडळी जमा करून यातील फिर्यादी नामे– श्रीमती माया जयवंत कुकडे वय ४५ वर्ष रा. मानेगाव यांच्या शेतातील पिकाचे नुकसान करून अतिक्रमण केले. यावरून फिर्यादीने आरोपीतांना हटकले असता शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीतांविरुध्द कलम १४३, ४२७, ४४७, ५०४, ५०६ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास बंडु कोकाटे ब.नं. ४३७ मो.नं. ९८२२९४३६०५ हे करीत आहे.

## फसवणुक

**पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत ०१ किमी अंतरावर सावनेर येथे दिनांक १४/०४/२०२३ चे १०/४४ वा. ते दिनांक १५/०४/२०२३ चे ११/५८ वा. सुमारास फिर्यादी नामे— सनी सुरेशराव पारवे, वय ३२ वर्षे, रा. वार्ड क्र. ११ बाजार चौक सावनेर यांची कोणीतरी अज्ञात इसमाने स्वत:च्या आर्थिक फायदयासाठी ऑनलाइन टास्क कम्प्लीट करण्याच्या नावाने तसेच जॉब लावुन देण्याच्या बहाण्याने फिर्यादीची ऑनलाईन ५,५६,६९१/— रूपयाची फसवणूक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवी सहकलम ६६ डी माहीती तंत्रज्ञान अधि. २००८ कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक मानकर पोलीस स्टेशन सावनेर मो. क्र. ७०२०७०५४१७ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**